वर्ग : एस. वाय. बी. ए. – एस. २


सत्र प्रथम, घटक – २

# साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व

प्रा. तुकाराम भवर

## प्रस्तावना :

शास्त्रीय साहित्याहून ललितसाहित्याचा वेगळेपणा सांगताना नेहमीच आत्माविष्काराचे सूत्र सांगितले जात असते. ललितसाहित्यातून होणारा आत्माविष्कार म्हणजे त्या साहित्यकृतीतून जाणवणारे लेखकाचे व्यक्तिमत्त्वच आहे म्हटले जाते. साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व ही काही मुळातच वेगळी वा अलौकिक गोष्ट नव्हे. सर्वसामान्य माणसाचे व्यक्तिमत्त्व आणि लेखक व कवीचे व्यक्तिमत्त्व यात गुणदृष्ट्या फक्त प्रमाणाचा फरक असतो. एरवी सारी माणसे तशी सारखीच असतात. साहित्यिकात काही गुणवैशिष्टये जास्त प्रमाणात असतात, हे लक्षात ठेऊन त्याचा येथे विचार करायचा आहे.



साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व
१
संवेदनक्षमता
२
शैशववृत्ती
३
अनुभवसमृद्धी
४
विद्वत्ता

## १) संवेदनक्षमता :

सामान्य माणूसही संवेदनक्षम असतो; पण संवेदनक्षमता हे लेखकाचे खास वैशिष्ट्य असते. वस्तूचे वा विषयाचे वरवरचे दर्शनी रूप ओलांडून आंतरूपाचा वेध घेणारी दृष्टीची सूक्ष्मता यात अभिप्रेत आहे. संवेदनक्षमता म्हणजे भावविवशता किंवा हळवेपणा नाही. कोणत्याही अनुभवातील सूक्ष्मातिसूक्ष्म बारकावे टिपण्याची क्षमता म्हणजे संवेदनक्षमता होय असे म्हणता येईल. संवेदन क्षमतेमुळे आपल्या ज्ञानेंद्रियांच्या संवेदनांविषयीची साक्षात प्रतीती आस्वादकाला घडवून देणे लेखक व कवीला जमते. उदा. बालकवींची कविता, दुर्गा भागवत यांचे ललितगद्य

काव्यनिर्मितीच्या संदर्भात कवीकडून होणारा अनुभवाचा स्वीकार आणि त्याची लावली जाणारी नवी व्यवस्था ही गोष्ट महत्त्वाची मानली जाते. याबाबतीत कवीकडून निश्चित केली जाणारी मूल्यसरणी म्हणजे त्याची ती संवेदनप्रकृती होय. सामान्य माणसातही ही प्रक्रिया होते; पण तिथे तिचे स्वरूप पारंपरिक असते. म्हणजे गरज, उपयुक्तता, संस्कृती, जीवन आदर्श यांतून आलेल्या मूल्यसरणीच्या आधारे अनुभवांची व्यवस्था लावली जाते. असा एक लौकिक वा व्यावहारिक म्हणू असा भाग कवी-लेखकांच्या व्यक्तिमत्त्वात असतोच, त्याच्या जोरावर लेखक लोकप्रिय किंवा रंजनपर साहित्य निर्माण करतो. या प्रकारच्या साहित्यामागील मूल्यसरणी वाचकांच्या सर्वसाधारण अभिरुचीशीच मिळते – जुळते घेण्याच्या प्रयत्नात असते. विशिष्ट अनुभव घेताना त्या अनुभवाच्या गुणधर्मांची एक खास जाण कवीला होत जाते. ती जाण म्हणजेच त्या कवी-लेखकाची संवेदनप्रकृती समजली जाते. नवनव्या अनुभवांचा स्वीकार करताना ती अधिकाधिक समृद्ध होत जाते. तसेच तिचे स्वरूप बदलूही शकते आणि तसे बदलणेच फार महत्त्वाचे असते.

कवीच्या अनेक  जाणिवा  मिळून त्याची समग्र संवेदनप्रकृती निर्माण होत असते. त्याच्याकडून लिहिल्या जाणाऱ्या सर्व काव्याला ती अंत:स्थपणे सूत्ररूपाने जोडीत असते. या संवेदनप्रकृतीमुळेच विशिष्ट कवीची प्रत्येक कविता एक स्वतंत्र, परिपूर्ण रचना असूनही ती त्याच्या अन्य कवितांशी जोडली जाते.

कवी नेहमीच हा कुठल्या तरी वाङ्मयीन परंपरेशी आपले नाते जोडत  असतो, पण त्याबरोबरच तो आपले स्वत्वही टिकवू पाहतो. डॉ. सुधीर रसाळ यांनी 'कविता आणि प्रतिमा' या ग्रंथात प्रस्तुत विषयाची फारच चांगली मांडणी केलेली आहे.

कवी एका विशिष्ट त-हेने अनुभवांचे निरीक्षण, त्यांचा स्वीकार आणि मग त्यांची एक संगती लावतो. तो स्वतःचा पिंडधर्म वेगळा राखूनच कवी या कालजन्य संवेदनप्रकृतीत समाविष्ट झालेलाही दिसतो.

उदा., अर्वाचीन कवितेचा किंवा नवकाव्याचा मराठीतील काळ. या दोन्ही काळातील कवींचे वेगळेपण जाणूनही काव्यात मात्र काही एक समानसूत्र जाणवते. रविकिरण मंडळाच्या काळाबद्दलही असेच म्हणता येईल.

## २) शैशववृत्ती :

साहित्यिकाच्या बाबतीत प्रौढ वयातसुद्धा शैशववृत्ती म्हणजेच बाळपणीचा स्वभावविशेष हा टिकून राहिला पाहिजे असे म्हटले जाते. कवी केशवसुतांनी 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' असे म्हटलेले आहे. कवित्व करण्यासाठी आवश्यक असा वृत्तीचा ताजेपणा, संवेदनक्षमता, आणि निरागसता इत्यादी विशेष कवीच्या ठिकाणी असले पाहिजेत. हे विशेष माणसाच्या ठिकाणी बालवयात असतात. बालवय ओलांडून माणूस जस-जसा मोठा होत जातो तस-तसे व्यवहाराच्या धकाधकीत हे विशेष कमी -कमी होत जातात. विचार वाढत जातात. ग्रहणक्षमतेतील नेमकेपणा व सूक्ष्मता कमी होत जाते आणि या साऱ्याचा काव्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

डॉ. सुधीर रसाळ यांनी चांगले विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते माणूस मोठेपणी त्याची जीवनपद्धती व आस्थाविषय नक्की झाल्यामुळे त्यांनाच अनुलक्षून अनुभव घेत असतो. तर मुलांच्या बाबतीत किंवा बालवयात असे नसते.  बालवयात जीवनपद्धती व आस्थाविषय नक्की झालेले नसतात. त्यामुळे प्रत्येक अनुभव हा अनुभव म्हणून, उपयुक्ततानिरपेक्ष म्हणजे तो किती उपयोगी आहे. हे न बघता तो अनुभव  बुद्धीने स्वीकारण्याची एक क्रिया या वयात मन करीत असते. बालकाची ही वृत्ती मोठेपणीही कवीमध्ये टिकत असते.

संवेदनांचा समरसून अनुभव घेताना मुलांच्या मनात या संवेदनांची व्यवस्था प्रामुख्याने रूपक प्रक्रियेतून लावली जाते. सर्वच लहान मुलांत वस्तूंचे सजीवीकरण (animation) आणि मानुषीकरण (personification) करण्याची प्रवृत्ती दिसून येते. लहान मूल दोन वस्तूंतील साम्य पाहत नाही, तुलना करीत नाही, तर फक्त एकात्मता पाहते. त्यांच्या मनात विविध संवेदना या जशा त्यांच्या ताजेपणासह व उत्कटतेसह टिकविल्या जातात, तसेच त्यांच्यात एकात्मता प्रस्थापित करून, म्हणजे रूपके घडवून, त्यांचे व्यवस्थापन केले जाते. हे कल्पनाशक्तीचेच कार्य आहे.

कवीच्या बाबतीत प्रौढ अवस्थेतही शैशववृत्ती जपणे म्हणजे ही विशिष्ट अशी काव्याच्या उपयोगी मानसिकता जपणे होय.

# ३) अनुभवसमृद्धी :

अनुभवांची समृद्धी हा कवी-लेखकाचा आणखी एक विशेष आहे. मात्र त्याचा विचार वर सांगितलेल्या दोन विशेषांच्या म्हणजे संवेदनक्षमता आणि शैशववृत्ती यांच्या पार्श्वभूमीवर केला जातो. कारण नुसत्या अनुभवांच्या समृद्धीला तसा विशेष अर्थ नाही.

क्षेत्र व खोली या दोन दृष्टींनी अनुभवांची समृद्धी जोखली जाते. म्हणजे अनुक्रमे ती संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्टीने होय.  लेखकाचे अनुभवक्षेत्र मर्यादित आहे की व्यापक, असा एक विचार केला जातो.

उदा. असा दृष्टिकोन घेऊनच श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांना 'सदाशिवपेठी कादंबरी' म्हणून हिणविलेले दिसते. कारण त्यांच्या मते हरिभाऊंचे अनुभवविश्व मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्री-जीवनापुरतेच मर्यादित आहे. मराठीतील बहुसंख्य लेखक, कालच्या पिढीतील जवळजवळ सर्वच लेखक मध्यमवर्गीय ब्राह्मण जातीचे आणि नोकरपेशाचे होते असे लक्षात येते. त्यांचे अनुभवविश्व आपोआपच त्यांच्या सामाजिक स्तराने मर्यादित  झालेले दिसते.

या उलट, स्टाइनबेक, हेमिंग्वे अशा इंग्रजी लेखकांचे अनुभवक्षेत्र व्यापक आणि विशाल असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांच्या लेखनात अनुभवदृष्टया तोचतोपणा किंवा परिचितता येत नाही. जीवनाची फार मोठी विविधता व वैचित्र्य त्यात प्रतिबिंबित झालेले दिसते.

जेन ऑस्टिनचे कथाविश्व म्हणजे दोन इंच रुंदीची हस्तिदंती पट्टी आहे. त्यावरच ती बारीक बारीक कोरीव काम करते असे तिच्या टीकाकारांचे मत आहे. इंदिराबाईंच्या कवितेत पतिवियोगाचा एकच एक शोकमय अनुभव सतत येत गेलेला दिसतो; पण तो एकसूरी वाटत नाही. तर त्यांच्या लेखनात  एकाच अनुभवाच्या असंख्य छटा आलेल्या दिसतात.

मराठीतील ना. सी. फडके यांच्या कादंबऱ्यांत विस्तृत असे अनुभवक्षेत्र दिसून येते; पण ही विस्तृतता फक्त संख्यात्मक (Quantitative) स्वरूपातच जाणवते, गुणात्मक (Qualitative) स्वरूपात नव्हे. त्यामुळे त्यांचे लेखन प्रत्ययकारक म्हणू असे उतरत नाही असे म्हटले जाते.

लेखकाचा अनुभव प्रत्यक्षातीलच हवा, तो नसेल तर त्याचे लेखन परिणामकारक होत नाही, अनुभवाची उसनवारी उपयोगाची नाही असे म्हटले जाते. परंतु बा. सी. मर्ढेकरांच्या महायुद्धकालीन विध्वंसित जीवनाचा अनुभव नसतानाही त्यांनी त्या अनुभवांचाच आविष्कार साधणारे काव्यलेखन केले. असे म्हटले जाते.

साधारणपणे ज्या जीवनाचा लेखकाला अनुभव नसतो त्या जीवनाचे चांगले चित्रण तो करू शकत नाही हे सत्य आहे.

उदा. रविकिरण मंडळातील काही कवींनी लिहिलेली जानपद - ग्रामीण गीते ही उथळ किंवा कृत्रिम झालेली आहेत. पण साहित्याच्या बाबतीत प्रत्यक्षानुभव एका मर्यादेपर्यंत मदत करीत असतो. तो असेल तरच साहित्य चांगले उतरू शकते असे मात्र म्हणता येत नाही.

लेखक कल्पनाशक्तीच्या जोरावर अनुभव घेऊ शकतो आणि त्याचे हे कल्पनानुभव साहित्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असतात. 'अरूपाला रूप' देण्याची किमया या शक्तीच्या जोरावरच तो करीत असतो. त्याच्या ठिकाणच्या सहानुभावाचीही याबाबतीत त्याला मोठी मदत होते.

लेखकाजवळ अनुभवांचे नुसते मोठे भांडार असून चालत नाही. या अनुभवात खोल आकलन करणे, त्यांचे कलानुभवात रूपांतर होणे, त्यांना एक स्वतंत्र आशय आणि नवा संदर्भ लाभणे महत्त्वाचे असते. यालाच अनुभवाची समृद्धी म्हणतात.

## ४) विद्वत्ता :

विद्वत्ता हा लेखक-कवीच्या दृष्टीने हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक आवश्यक विशेष आहे असे म्हटले जाते. म्हणजेच लेखक-कवी हा ज्ञानी हवा, असे मानले जाते.

वरील वाक्याचा विचार करतांना ज्ञानसंपन्नता हा साहित्यिकाचा एक आवश्यक विशेष मानता येईल का, असा प्रश्न निर्माण होतो. याचे म्हणजे तो सर्वप्रथम साहित्यिक म्हणजे नवनिर्मिती क्षमता असणारा हवा. परंतु तो विद्वान असावाच असे मात्र नाही.

विद्वत्ता हा कवीचा एक विशेष असे म्हणता येत नाही. यासाठी जुन्या काळातील तुकाराम, चोखामेळा, कान्होपात्रा, जनाबाई यांच्याबरोबरच अलीकडच्या काळातील बहिणाबाई चौधरी, अण्णाभाऊ साठे, उत्तम बंडू तुपे इत्यादी उदाहरणे देता येतील. हे सर्व कवी-लेखक विद्वान जरी नसले तरी त्यांनी लेखन मात्र केलेले आहे. तरीही ज्या विश्वाची निर्मिती लेखक करतो आहे त्याचे सर्वांगीण ज्ञान त्याला असणे आवश्यक आहे. त्याशिवाय या विश्वाचे बारकावे टिपणे त्याला शक्य होणार नाही.

उदा. ग्रामीण जीवनाची काहीही माहिती नाही असा शहरी लेखक ग्रामीण जीवनावर काही गोलमाल स्वरूपात लिहू शकेलही; पण त्याचे लेखन प्रत्ययकारक होणार नाही. कारण लिखाणासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीपर तपशिलाच्या बाबी तो योग्यपणे मांडू शकणार नाही.

साहित्यशास्त्राचे ज्ञान त्याने हस्तगत केले असेल तर तो आपल्या स्वत:च्या व इतरांच्या साहित्याचे चांगले मूल्यमापन करू शकेल. मराठीतील माधव ज्यूलियन, बा. सी. मर्ढेकर, प्रा. गो. वि. (विंदा) करंदीकर अशा व्यक्तींनी फार चांगल्या त-हेने समीक्षक व कवी या दोन्ही भूमिका बजावलेल्या आहेत; पण असे साहित्यशास्त्राचे ज्ञान नसलेल्या बालकवींनीही उत्तम कविता लिहिल्या आहेत.

चांगला लेखक-कवीला असायला हवी ती प्रतिभेची देणगी, विद्वत्ता हवीच असे नाही. चांगला शेतकरी व्हायला कृषिशास्त्राचे ज्ञान हवेच असे जसे नाही, तसेच साहित्यिकाजवळ कवित्व हवे, अभ्यासजन्य ज्ञान हवेच असे नाही.

अशा रीतीने साहित्यिकाचे व्यक्तिमत्त्व पाहत असतांना आपण संवेदनक्षमता, शैशववृत्ती, अनुभव समृद्धी आणि विद्वता या चार मुद्यांचा सविस्तर विचार केलेला आहे.

धन्यवाद !